प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
CIDCO WE MAKE CITIES
सिडको
CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294; email: mohan.ninawe@gmail.com

**२३ जून २०१८**

**नेरूळ-उरण रेल्वे प्रकल्पाची सिडकोचे**

**उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांच्याकडून पाहणी**

सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक **श्री. लोकेश चंद्र** यांनी आज **दिनांक २३ जून २०१८** रोजी नेरूळ-उरण रेल्वे प्रकल्पाची पाहणी केली. व्यवस्थापकीय संचालक पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर सिडकोच्या सर्व प्रकल्पांची पाहणी करून हे प्रकल्प वेगाने आणि निर्धारित वेळेत पूर्ण करण्याच्या अनुषंगाने या पाहणी दौऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. यापूर्वी त्यांनी आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प आणि उलवे, द्रोणागिरी या दोन्ही नगरांतील विकास कामांची पाहणी केली होती.

आज नेरूळ-उरण रेल्वे प्रकल्पाची पाहणी करताना त्यांनी प्रथम सिवूडस् दारावे रेल्वे स्थानकास भेट दिली. या स्थानकाच्या विकासाचे काम एल ॲन्ड टी तर्फे करण्यात येत आहे. स्थानकाचे विकासकाम अत्याधुनिक तंत्रज्ञानानुसार सुनियोजित पद्धतीने करण्यात येत असून सदर रेल्वे स्थानक हे नवी मुंबईतील सर्वोत्तम स्थानक असेल, असा विश्वास व्यवस्थापकीय संचालकांनी यावेळी व्यक्त केला. त्यानंतर त्यांनी या मार्गावरील तरघर, बामणडोंगरी आणि खारकोपर या स्थानकांच्या विकासकामांचीही पाहणी केली. यातील सीवूडस्, बामणडोंगरी आणि खारकोपर स्थानकांचे काम जून अखेरपर्यंत पूर्ण करून पुढील ट्रॅकींग, ट्रॅक्शन आणि टेलिकम्युनिकेशन या कामांसाठी रेल्वेकडे हस्तांतरित करण्याच्या तसेच तरघर स्थानकाचे काम जुलै अखेरपर्यंत पूर्ण करण्यासंदर्भातील सूचना त्यांनी या प्रसंगी दिल्या. या सर्व स्थानकांचे सिडकोकडील काम पूर्ण करून पुढील कामे रेल्वेने करावयाची असल्यामुळे त्यांना सहकार्य करण्यासंदर्भातही श्री. लोकेश चंद्र यांनी सूचना दिल्या.

तरघर रेल्वे स्थानकाचे काम पूर्ण झाले तरी पहिल्या टप्प्यात या स्थानकावर उपनगरीय रेल्वे थांबणार नाही. खारकोपरपर्यंतची रेल्वे सेवा १५ ऑगस्ट पासून सुरू व्हावी यासाठी सिडको व रेल्वे या दोन्ही यंत्रणा प्रयत्नशील आहेत.

सिवूडस् ते खारकोपर या पहिल्या टप्प्याचे अंतर १२ किमी असून पुढे खारकोपर ते उरण हे अंतर १५ किमी आहे. एकूण २७ किमीचे हे रेल्वे जाळे विकसित करण्यासाठी सिडको व रेल्वे विभाग यांच्याकडून अनुक्रमे ६७:३३ टक्के अशा गुणोत्तरात गुंतवणूक करण्यात येत आहे. एकूण १७८२ कोटी रुपये खर्चाचा हा प्रकल्प असून यात ४ उड्डाण पूल, १५ सबवे मार्गिका, रस्ते यांचा समावेश आहे. सर्व रेल्वे स्थानकांवर दुहेरी फलाट, प्रवाशांसाठी सबवे, पिण्याचे पाणी, रेल्वे कार्यालये आणि संलग्न सुविधा व फोरकोर्ट एरियाचा विकास, या सर्व विकासकामांचा समावेश आहे.

या पाहणी दौऱ्यात सिडकोचे मुख्य अभियंता (विशेष प्रकल्प) श्री. एस. के. चौटालिया, अतिरिक्त मुख्य अभियंता श्रीमती शीला करुणाकरन, अधिक्षक अभियंता श्री. एम. पी. पुजारी, अभियंते, कंत्राटदार आणि वास्तुतज्ञ सहभागी झाले होते.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

मा. संपादक महोदय,

वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.

**वरिष्ठ जनसंपर्क अधिकारी, सिडको**